# हमीपत्र

(नियम १३(२)(सात) पहा)

मी / आम्ही श्री. / श्रीमती ........................................................................ हमी देतो / देते की, महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) नियम, २०१८ मधील नियम १३ मध्ये नमूद केलेल्या खालील सुविधा महिला कामगारांना पुरविण्यात येत आहेत. तसेच सर्वसाधारण व विशेषत: रात्रपाळीत काम करणाऱ्या महिला कामगारांची प्रतिष्ठा, मानसन्मान व सुरक्षितता यांचे पुरेसे संरक्षण याबाबत योग्य ती काळजी व दक्षता घेण्याबाबत पूर्तता करण्यात आली आहे.

**(१) महिला कामगारांना कोणत्याही आस्थापनेत महिला कामगारांची संख्या विचारात न घेता कामावर बोलविण्याबाबतच्या सर्वसाधारण शर्ती पुढीलप्रमाणे आहेत.**

(एक) कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम, २०१३ च्या सर्व तरतुदींचे काटेकोरपणे कार्यान्वयन आणि अंमलबजाणी करण्यात आली आहे. तसेच कामाच्या ठिकाणी लैंगिक छळाची कृत्ये घडण्यास प्रतिबंध करण्यासाठी किंवा ती टाळण्यासाठी सर्व उपाययोजना व खबरदारी घेण्यात **येत आहे / येईल.**

(दोन) कामाच्या ठिकाणी महिला कामगारांबाबत त्रयस्थ व्यक्तीकडून कृतीव्दारे किंवा लैंगिक छळाचा प्रयत्न झाल्यास पाठिंबा आणि प्रतिबंधात्मक कारवाईच्या स्वरुपातील सर्व आवश्यक आणि वाजवी उपाययोजना करून पिडीत महिलेला सहाय्य करण्यास बांधिल आहे.

(तीन) आस्थापनेच्या आतल्या बाजूस तसेच आस्थापनेच्या परिसरात आणि अशा कामाच्या पाळीत कामाची गरज म्हणून महिला कामगार ज्या ठिकाणी वावरेल अशा सर्व ठिकाणी योग्य ते दिवे आणि प्रकाश योजना करण्यात **आली आहे / येईल.**

(चार) आस्थापनेत तक्रार पेटी, याशिवाय आस्थापनेत सहज दिसेल अशा ठिकाणी स्थानिक पोलिस स्टेशन नियंत्रण कक्ष व महिला सहाय्यता मदत कक्ष यांचे दूरध्वनी क्रमांक प्रदर्शित करण्यात **आले आहेत / येतील.**

(पाच) दहापेक्षा जास्त महिला कामगार असल्याने आस्थापनेत ----- महिला सुरक्षा रक्षक **नेमलेले आहेत / नेमण्यात येतील.** या महिला सुरक्षा रक्षकांची पोलिसांकडून चारित्र पडताळणी करण्यात **आली आहे / येईल.**

(सहा) आस्थापनेत महिला कामगारांकरीता स्वतंत्र ज्याला फक्त आतूनच कडी लावण्याची सुविधा असे प्रसाधनगृह उपलब्ध आहे.

**(२) महिला कामगारांना रात्रपाळीत कामावर बोलवल्यास** पुढीलप्रमाणे **अतिरिक्त शर्तींची पुर्तता करणे आवश्यक आहे.**

(एक) नमुना “ल” मध्ये महिला कामगारांची संमती घेतल्यानंतरच कोणत्याही आस्थापनेत रात्री ९.३० ते सकाळी ७.०० या दरम्यान काम करण्यास बोलविण्यात येईल.

(दोन) आस्थापनेतील कोणत्याही पाळीत किमान ३ पेक्षा कमी महिला कामगार असणार नाहीत.

(तीन) सुरक्षिततेच्या दृष्टीने रात्रपाळीत काम करणाऱ्या महिला कामगारांसाठी कामाच्या ठिकाणावरुन घराच्या दारापर्यंत तसेच घराच्या दारापासून कामाच्या ठिकाणी येण्यासाठी सुरक्षित व सुस्थितीत असलेली स्वतंत्र वाहतुक व्यवस्था उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

आस्थापना मालकाकडे त्याने स्वत:हून कामावर ठेवलेल्या किंवा कोणत्याही अभिकरण (एजन्सी) किंवा ठेकेदारामार्फत कामावर ठेवलेल्या वाहन चालक, सुरक्षा रक्षक आणि अशा सर्व कर्मचाऱ्यांचा सर्व तपशिल ठेवण्यात आला आहे.

तसेच महिलांना सुरक्षित व सुस्थितीत ने-आण करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांची पोलिसांकडून चारित्र पडताळणी करुन घेण्यात आली आहे.

(चार) अधिनियमाच्या कलम १८ अन्वये अनुज्ञेय असलेल्या रजेच्या व्यतिरीक्त आस्थापनेतील पाळ्यांच्या नियोजनाप्रामाणे महिला कामगारांनी रात्रपाळीत काम केल्यास अशा प्रत्येक महिला कामगारांस एका वर्षात, प्रत्येक दोन महिन्यांकरीता एक दिवस याप्रमाणे अनुज्ञेय अतिरीक्त भरपगारी रजा **देण्यात येते / येईल.**

(पाच) कोणत्याही महिला कामगारास दिवस पाळीतून रात्रपाळीत आणि रात्रपाळीतून दिवसपाळीत बदली करताना मागील पाळी व रात्रपाळी यामध्ये किमान एकुण १२ तासांपेक्षा कमी नसेल इतका विश्रांतीचा वेळ किंवा मधला वेळ देण्यात येतो / येईल.

(सहा) कोणत्याही महिला कामगारास प्रसुतिपुर्वी २४ आठवडयांच्या आणि प्रसुतिनंतर २४ आठवडयांच्या कालावधीत रात्रपाळीत काम देता येणार नाही. त्यापैकी कमीतकमी १२ आठवडे हे अपेक्षित प्रसुतिपुर्वीच्या कालावधीचे असतील आणि आणखी कालावधी करीता, कोणताही असल्यास सदर महिला किंवा तिच्या बालकाच्या आरोग्याच्या दृष्टिने वैद्यकिय प्रमाणपत्रामध्ये तो वाढवावा असे नमुद केले असेल तर त्या कालावधीपर्यंत वाढविण्यात येईल.

परंतु, उक्त कालावधी सदर महिला कामगाराच्या विनंतीवरुन आणि अर्हता प्राप्त वैद्यकिय व्यवसायी यांना सदर महिला आणि तिच्या बालकाच्या आरोग्यास धोका नाही असे वैद्यकिय प्रमाणपत्र दिल्यास हा कालावधी शिथील करता येईल.

दिनांक :

ठिकाण :

मालकाचे नाव आणि स्वाक्षरी

मोहरेसह आस्थापनेचे नाव आणि पत्ता